*NEW INTERNATIONAL*
**VALUABLE RESEARCH JOURNAL**

**Chief Executive Editor**
Asst. Prof. A.V. Hingmire

**ADVISORY BOARD**

- **Dr. Ganesh Shetkar,**
  Asst. Professor,
  Govt. B.Ed. College, Ambajogai.
  Member of Management Council,
  Dr. B.A.M.Univ. Aurangabad.
- **Dr. B.S. Handibag,**
  Dean, (Language Faculty)
  Dr. B.A.M.U. Aurangabad.
- **Prof.Dr. D.B. Dhaigude,**
  Dept. of Maths
  Dr. B.A.M.U. Aurangabad.
- **Dr. Ganpat Rathod,**
  Reader, (Dept. of Hindi)
  S.R.T. College, Ambajogai
- **Dr. A.Y. Dalvee**
  Principal,
  Vasundhara Mahavidyalaya,
  Ghatnandur, Tq. Ambajogai.
- **Dr. R.N. Karpe**
  Co-ordinator,
  N.S.S. Programme,
  Dr. B.A.M.U. Univ. Aurangabad.
- **Prof. Dr. Shobhna Joshi,**
  Dean, Faculty of Edu.
  Head of Dept.(Edu.)
  Dr. B.A.M.Univ. Aurangabad.
- **Dr. V.V. Khandare,**
  Dean, (Social Science)
  Dr. B.A.M.U. Aurangabad.
- **Dr. D.D. Sawale**
  Reader, HOD (Dept. of History)
  V.R. Shinde College, Paranda.
  Chairman, BOS (History)
  Dr. B.A.M.Univ. Aurangabad
- **Dr. Ankush Kadam,**
  Asst. Prof. (Dept. of Physics)
  Jawahar College, Andur
  Member of Academic Council,
  President of BAMUCTA A'bad.
- **Dr. Haridas Rathod,**
  Vice Principal,
  Havgiswami Mahavidyalaya,
  Udgir, HOD (Dept. of Geo.)

www.prathmeshpublication.in

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

ORIGINAL ARTICLE

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय

प्रा.डॉ.बिरादार बी.एम.
सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग,
श्री गुरुबुद्धी स्वामी महाविद्यालय पूर्णा,
ता.पूर्णा, जि.परभणी

**प्रस्तावना : -**

प्राचीन काळापासून शेती हे भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रमुख क्षेत्र आहे. शेती हा भारतीय लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे. भारताची संपूर्ण अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे. भारतात एकूण लोकसंख्येपैकी ६८ % लोक खेड्यात राहतात. देशातील ५८ % लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे. यापैकी ६० % लहान शेतकरी, ३० % मध्यम शेतकरी आणि १० % मोठे शेतकरी आहेत. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात ४० % वाटा हा शेती उत्पादनाचा आहे. देशातील जवळपास ५४.४ % कार्यशील लोकसंख्या प्रत्यक्षरित्या शेती व त्यावर आधारीत व्यवसायावर अवलंबून आहेत. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात २७ % वाटा शेती क्षेत्राचा आहे. सर्वाधिक रोजगार निर्मितीचे क्षेत्र कृषी आहे. उद्योगाला कच्चा माल हा शेतीमधूनच मिळतो. देशाची बाजारपेठीचे अस्तित्व कृषीक्षेत्रावरच आधारीत आहे. भारताच्या निर्यातीत कृषी क्षेत्राचा फार मोठा वाटा दिसून येतो.

भारतीय शेती प्रामुख्याने पावसावर अवलंबून आहे. शेती मानवाला अन्न, वस्त्र पुरविण्याचे मुख्य साधन आणि हेच साधन निसर्गावर अवलंबून असल्याने त्याच्या अनिश्चितीत भर पडते. रासायनिक खताचा अभाव याचा परिणाम शेती उत्पादनात घट, जे काही उत्पादन होते त्या उत्पादनास उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळत नाही. बऱ्याच वेळी उत्पादन खर्चापेक्षा कामी किमंतीत विकावा लागतो. वाढती महागाई कुटुंबाचा पालन पोषणाचा वाढता खर्च, शिक्षणाचा खर्च, आजारपण, शेतीतील गुंतवणूक, मुला-मुलींचे लग्न यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत चालला आहे. शेवटी कर्जबाजारीपणामुळे शेतकरी आत्महत्येचा मार्ग स्विकारतो. गेल्या काही वर्षापासून आत्महत्येचे सत्र चालू असून तयात सतत वाढ होत आहे. ही बाब चिंताजनक असून त्यामागील कारणे शोधने गरजेचे आहे आणि त्यावर उपाय सूचवणे महत्त्वाचे आहे.

प्रस्तुत शोध निबंधाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या स्थितीचा अभ्यास करणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारणे शोधून त्यावर उपाय सूचवणे आहे. या शोध निबंधासाठी द्वितीय सामग्रीचा उपयोग केलेला आहे. यात विविध ग्रंथ, वर्तमानपत्रे, मासिके यांचा आधार घेण्यात आला आहे.

केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी ३० नोव्हेंबर २००७ ला राज्यसभेत सांगितले की, १९९७ ते २००५ या कालावधीत दिड लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी ७९ हजार आत्महत्या म्हणजे ५९ % या महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक या राज्यात झाल्या आहेत. १९९५ ते २०११ पर्यंत शासकीय आकडेवारीनुसार दोन लाख नव्वद हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. महाराष्ट्र राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण फारच जास्त आहे. महाराष्ट्रातील विदर्भात सर्वात अधिक आत्महत्या २००६ मध्ये १४४८ शेतकऱ्यांनी केल्या. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशननुसार सन २००७ मध्ये १२४६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. २००८ मध्ये ३०५ आणि २००९ मध्ये २०१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. शेतकऱ्यांच्या आत्महत्येत अग्रेसर असलेली काही प्रमुख राज्यांची आकडेवारी सन २०११, महाराष्ट्र-३३३७, आंध्रप्रदेश-२२०६, कर्नाटक-२१००, मध्यप्रदेश-१३२६.



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

**आत्महत्येची कारणे : -**

१) **कर्जबाजारीपणा :** भारतीय शेतकरी, शेती कामासाठी सावकाराकडून आणि बँकेकडून कर्ज घेतो. शेती हा व्यवसाय पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे उत्पादनाची शाश्वती नाही. यामुळे घेतलेले कर्ज वेळेवर फेडले जात नाही. परिणामी घेतलेले कर्ज आणि त्यावरील व्याज वाढत जाते. शेवटी कर्जाच्या दुष्ट चक्रात शेतकरी अडकतो. सावकार आणि बँका शेतकऱ्यांकडे कर्ज फेडीसाठी तगादा लावतात. शेतकरी आर्थिक अडचणीत येऊन आत्महत्याकडे वळतो.

२) **रुढी, परंपरा, प्रथा :** भारतीय शेतकरी रुढी, परंपरावादी आहे. शारीरिक कष्ट करण्यापेक्षा देवावर विश्वास ठेवणाऱ्या रुढी, परंपरा, प्रथा पाळण्यासाठी शेतकरी कर्ज घेतो. हे अनुत्पादक कार्यासाठी खर्च होत असल्यामुळे त्यापासून उत्पन्न मिळत. कौटुंबीक कलह निर्माण झाले की, कर्ज परत करणे शक्य होत नाही. परिणामी त्यातून सुटका करुन घेण्यासाठी आत्महत्यांचा मार्ग स्वीकारतो.

३) **कर्जाचा अनुत्पादक कार्यासाठी खर्च :** शेतकऱ्याला खते, बी-बियाणे, औषध यासाठी पैशाची गरज असते. बँकेकडून या कारणासाठी कर्ज घेतो. घेतलेल्या कर्जातून शेतीसाठी लागणारे साहित्य न घेता सण-उत्सव, लग्नकार्य, दवाखाना या कारणासाठी खर्च करतात. या खर्चातून उत्पादन मिळत नाही. परिणामी शेतकरी कंगाल होतो व आत्महत्येकडे वळतो.

४) **लोकसंख्या वाढ :** भारतात लोकसंख्या वाढीचा विस्फोट झाला आहे. जमिनीचे उपखंडन आणि विभाजन मोठ्या प्रमाणात झालेले आहे. परिणामी लहान आणि सिमान्त शेतकऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे आणि मोठे कुटुंब आणि शेती लहान यामध्ये कुटुंबाच्या गरजा भागवणे शक्य होत नाही. शेतकरी अडचणीत येऊन आत्महत्येचा मार्ग अवलंब करतो.

५) **शिक्षणाचा अभाव :** सर्वसाधारणपणे शेतकरी हा अशिक्षित आहे. त्याला आधुनिक शेती पद्धतीची माहिती नाही. तो परंपरागत शेती करतो. यामुळे त्याचे उत्पन्नाचे प्रमाण घटते. परिणामी तो आर्थिक अडचणीमुळे आत्महत्येकडे वळतो.

६) **सिंचनाच्या अपुऱ्या सोयी :** एकूण लागवडीखलील क्षेत्रापैकी सुमारे १३ % क्षेत्र सिंचनाखाली आहे. शेती पावसावर अवलंबून आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी संकटात सापडतो. परिणामी आत्महत्येस प्रवृत्त होतो.

७) **सेझचा अवलंब :** भारतात काही भागात सेझ लागू केल्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना भूमिहीन व्हावे लागते. त्या भागातील शेती शेतकऱ्यांच्या हातून गेल्यामुळे तेथे रोजगार ही मिळेनासा झाला. परिणामी शेतकरी आत्महत्या करु लागला.

८) **किमंतीत अस्थैर्य :** शेतीमालाच्या किमंती सतत कमी जास्त होतात. शेतमालाच्या मोठ्या प्रमाणात पुरवठा वाढल्यास किमंती कमी होतात. भारतात शेतमालाच्या किमंतीची शाश्वती नसल्यामुळे शेतकरी मिळेल त्या भावास शेत माल विकतात.

९) **वाढते भारनियमन :** भारतीय शेती पावसावर अवलंबून आहे. काही वेळेस तलाव, विहीरी, ओढे, धरण यात पाणी असूनही भारनियमनामुळे शेतीला पाणी देता येत नाही. ग्रामीण भागात काही ठिकाणी भारनियमन १८ तासापर्यंत पोहचले आहे. शेतीला पाणी कमी पडते. परिणामी शेती उत्पादकता घटते.

१०) **नैसर्गिक साधने :** भूकंप, अतिवृष्टी, दुष्काळ, पिकावरील रोग इत्यादी कारणांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाले. परिणामी अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

**उपाययोजना : -**

१) शेतकऱ्यांना सिंचन व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी. तुषार सिंचन, ठिबक सिंचन, पद्धतीचा अवलंब केला पाहिजे.
सेंद्रीय शेतीचा विकास करावा. जलसंबंधी कामाला गती दिली पाहिजे.

२) पाणी व्यवस्थापनाचा प्रश्न युद्ध पातळीवर हाती घेऊन त्यासाठी प्रत्येकाच्या शेतात पाणी अडवून ते फिरविले



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.) Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

पाहिजे. कोरडवाहू शेतीत विहीर खोदण्याच्या कामास प्राधान्य द्यावे.

३) शेतकऱ्यांचा शेतमाल सुरक्षित राहण्यासाठी गोदाम उभारावीत, शेत मालाला योग्य भाव मिळवून द्यावे. शेतमालासाठी हमी भाव निश्चित करावा.

४) सहकारी बाजारपेठेचा विकास करावा. बाजारातील दलालाचे उच्चाटन करावे. जेणे करून शेतकऱ्यांना आपला माल सरळ उपभोगत्यांना विकता येईल.

५) शेतीसाठी वीज पुरवठा नियमीत व पुरेसा करावा.

६) बँकांना वेळेवर आणि गरजेपुरते कर्ज पुरवणे आवश्यक आहे.

७) शेतीसोबत शेतकऱ्यांना जोडधंदा करण्यासाठी प्रोत्साहन व सरकारी अनुदान द्यावे. गोपालन, कुक्कुटपालन, शेळीपालन, वराहपालन, मेंढीपालन, वनसंगोपन. लहान प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन व अनुदान द्यावे.

८) सरकारने सर्वच पिकासाठी पिक विमा योजना लागू करावे.

९) पंचवार्षिक योजनेत शेती क्षेत्रावरील सुविधा वाढवाव्यात.

१०) शेतकऱ्यांना प्रतिष्ठेचा दर्जा मिळावा, यासाठी खास प्रयत्न करावेत.

११) शिक्षणाचा प्रचार-प्रसार करावे.

१२) लोकसंख्या नियंत्रणासाठी कायदेशीर उपाय योजावेत.

१३) सरकारी योजना शेतकऱ्यांपर्यंत कशा पोहचतील याकडे बारकाईने लक्ष द्यावे.

१४) कमी किमंतीत दर्जेदार बी-बियाणे रासायनिक खताचा पुरवठा योग्य वेळी करावा. यासाठी स्वतंत्र वितरण व्यवस्था उभी करावी.

१५) कृषी विद्यापीठाने आपल्या कार्य क्षेत्रातील जमिनीची प्रत, पाण्याची उपलब्धता याचा विचार करुन पिकांची योजना तयार करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे.

१६) शेतकऱ्यांना शेती विषयक मार्गदर्शन, ज्ञान, कृषि खात्यामार्फत द्यावे. त्यासाठी चर्चासत्रे, ग्रामीण पातळीवर आयोजित करावी.

१७) शेतकऱ्यांच्या अनुदानात आणि सबसिडीत मोठ्या प्रमाणात वाढ करावे. याचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्याला मिळतो का नाही हे पाहण्यासाठी सक्षम व प्रामाणिक यंत्रणा उभी करावी.

१८) लग्न समारंभ साधेपणाने करावेत, सामुहिक विवाह समारंभ, कोर्ट मॅरेज इत्यादींना प्रोत्साहन द्यावे. त्यामुळे आर्थिक ताण कमी होईल.

१९) शेतीला लागणारे अवजारे, जोडधंद्यासाठी अर्थसहाय्य द्यावे.

भारताच्या आर्थिक विकासात शेती क्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण मानली जाते. भारतासारख्या शेतीप्रधान देशात शेतकऱ्यांची आत्महत्या ही अधिक चिंतेची बाब आहे. दिवसेंदिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. या आत्महत्येसाठी अनेक कारणे कारणीभूत आहेत. या आत्महत्या रोखणे आज काळाची गरज बनली आहे. यासाठी भक्कम उपाययोजना करुन शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणे आवश्यक आहे. सरकारकडून जोपर्यंत ठोस कार्यक्रम आखला जात नाही तोपर्यंत शेतकऱ्यांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण कमी होणार नाही.

**संदर्भ :**

१) डॉ.सुरेश फुले (२००९), महाराष्ट्राचा भूगोल, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.

२) डॉ.सौ.स्मिता कोंडेकर (            ) भारतीय अर्थव्यवस्था.

३) के.नागराज (२००९) भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या परिणाम प्रवाह, चेन्नई.

४) प्रभाकर देशमुख (१९९८), भारतीय अर्थव्यवस्था पिंपळापुरे अॅन्ड कंपनी पब्लिकेशन, नागपूर

५) लोकराज्य, सप्टेंबर २००८, जुलै २००९, जून २०१०.

६) योजना, मार्च २०१०.

७) डॉ.मारोती कच्छवे, संपादक (२०१३), भारतीय शेती व जागतिकीकरण, न्यू मॅन पब्लिकेशन्स, परभणी.



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Shikshan Prasarak Sanstha's
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna (Jn.)
Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani